# प्रेस नोट

दि. १०/०४/२०१९

**स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा सिंधुदुर्ग कडुन गोवा बनावटीची दारु.वाहन जप्त तसेच आरोपीस अटक.**

---

मा पोलीस अधीक्षक श्री. दिक्षीत गेडाम सिंधुदुर्ग यांनी जिल्हातील गोवा बनावटीची दारुची वाहतुक रोखण्यासाठी स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पी.एन.पाटील यांना दिलेल्या आदेशानुसार पोलीस निरीक्षक श्री.पाटील व त्यांचे पथकातील श्री.फडणीस, पोलीस उपनिरीक्षक सोबत सपोफौ एस.जी.खांदारे, पोहेकॉ कोयंडे, पोना/धुरी, पोना/खंडे, पोना/वालावलकर, पोना/राऊत, पोकॉ/सरमळकर यांचे दिनांक १५/०६/२०१९ रोजी पहाटे मुंबई ते गोवा महामार्गवर बांदा कट्टा येथे सदर पथकाने सापळा रचून वाहन नं MH 12 DG-8419 ही अडवून तिची तपासणी केली असता सुमारे ९,९६,०००/- रुपये किंमतीची गोवा बनावटीची दारु मिळुन आली. वाहन चालक एकनाथ जयबल व रमराव जयभल रा.बीड यांस ताब्यात घेतले. सदर गुन्हयात एकूण वाहन व मुद्देमाल असा एकूण १७,९६,०००/-रु. किंमतीचा जप्त करण्यात आला.

तसेच सदर बाबात बांदा पोलीस ठाणे येथे आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारु बंदी अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

दिक्षीत गेडाम
पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग